


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

जग कधीच तुमच्या स्वाभिमानाची
पर्वा करत नाही...
स्वतःबद्दल अभिमान बाळगण्याआधी
काहीतरी करुन दाखवा...
स्वतःला सिध्द करा...

वर्ष : ०५ | अंक : १५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.३० ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आझाद मैदानावरून मनोज जरांगेंची मोठी घोषणा

## जरांगे पाटलांच्या आंदोलकांना कोणत्या सूचना?

- कोणीही रस्त्यावर किंवा कुठेही गोंधळ घालायचा नाही.
- कोणीही दगडफेक, जाळपोळ करायची नाही.
- मुंबई आपण जाम केली, आता दोन तासांत मुंबईचे रस्ते मोकळे करा.
- सर्वांनी पोलिसांना सहकार्य करा.
- सरकारने जे मैदान दिलंय, तिथंच तुम्ही झोपा. काहीजण वाशी इथं जाऊन झोपा.
- अधिकृत पार्किंगची व्यवस्था जिथं करण्यात आलीय तिथंच गाड्या लावा. हायवेवर गाड्या उभ्या करू नका.
- मुंबईकरांना त्रास झाला नाही, पाहिजे ही जबाबदारी आपली आहे.
- जे आम्हाला मुंबईत सोडण्यासाठी आले होते, त्यांनी परत माघारी गेलं तरी चालेल.
- आपल्याला आरक्षण पाहिजे आहे, त्यावर लक्ष केंद्रित करा, इतर कोणतीही गोष्ट करायची नाही.
- आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबई सोडायची नाही.



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील अखेर मुंबईतील आझाद मैदानात पोहोचले असून त्यांनी सकाळी १० वाजल्यापासून आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. आझाद मैदानात पोहोचताच जरांगे पाटील यांनी आता सरकारने मला गोळ्या घातल्या तरी चालतील, पण आरक्षण घेतल्याशिवाय माघारी जाणार नसल्याची घोषणा केली. तसंच राज्यभरातून मुंबईत दाखल झालेल्या हजारो आंदोलकांना शांत राहण्याचं आणि मुंबईकरांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याचं आवाहन केलं आहे

आपलं ठरलं होतं की मुंबईला जायचं आणि आमरण उपोषण आझाद मैदानावरच करायचं. त्यानुसार आज आपण उपोषणाला सुरुवात केली आहे. आता तुमची जबाबदारी काय आहे? सरकार आपल्याला सहकार्य करणार नव्हतं, म्हणून मराठा समाजाने ठरवलं होतं की मुंबईला जायचं आणि मुंबई जाम करायची.

त्यानुसार आपण मुंबई जामही केली. पण आता एक गोष्ट लक्षात घ्या, सरकारने आपल्याला सहकार्य केलंय, परवानगी दिली आहे. त्याबद्दल आपण काल-परवा मोठ्या मनाने सरकारचं कौतुकही केलं. आता आपल्याला उपोषणाला परवानगी मिळाली आहे, आता सगळ्यांनी सहकार्य करायचं आणि शांततेत राहायचं, असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजबांधवांना केलं आहे.

## सरकार इंग्रजांपेक्षा बेक्कार, मनोज जरांगेंचा घणाघात...

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांना प्रशासनाकडून आंदोलनासाठी एक दिवसाची मुदतवाढ मिळाल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप केले. आझाद मैदानावर आलेली आंदोलक वैतागून निघून जावीत यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सरकारने बंद केली, शौचालये बंद केली, चहा आणि नाष्टाची दुकाने तसेच जेवणाची हॉटेल बंद ठेवली, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी सरकारवर सडकून टीका केली.

सरकारने काय केलं ते मला माहीत नाही. त्यांनी काल परवानगी दिली, आज दिली, आणखी आता उद्याची दिली. माझं म्हणणं आहे, हे असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा सरकारने असली डाव खेळावा आणि मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावं. मराठ्यांचं मनं जिंकणं गरजेचं आहे. मी सकाळीसुद्धा तेच सांगितलं आणि आता सुद्धा तेच सांगतोय. सरकारला आता अशी योग्य संधी आहे, गोरगरिबांची मनं जिंकण्याची योग्य वेळ आहे. सरकारला सगळे विसरतील पण गोरगरीब मराठे विसरणार नाहीत, जर त्यांनी गोरगरीब मराठ्यांना आरक्षण दिलं. माझा गरीब मराठा मरेपर्यंत विसरणार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.

**'तुम्ही तर इंग्रजांपेक्षा बेक्कार'**

जसं पोलीस बांधव आढाव घेतात तसं आमच्याही माहिती आहे. सरकारने शौचालयाचे कुलुप लावून दारं बंद केली, पाण्याची परिस्थिती तीच आहे. अशी माहिती मिळाली की, चहाचे, नाष्टाचे आणि जेवणाचे दुकानंदेखील बंद केले. त्यामुळे आंदोलक हे सीएसटीला बसले होते. त्यामुळे हे प्रोब्लेम होत आहेत. जेवायला मिळू नये, चहापाणी मिळू नये आणि मराठ्यांनी वैतागून निघून जावं, असे प्रयत्न आहेत. तुम्ही तर इंग्रजांपेक्षा बेक्कार झाले, असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# राजुरा - गडचांदूर मार्गावर भीषण अपघात!

## ६ जण ठार तर एक गंभीर जखमी, चंद्रपुरात उपचार सुरु

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा - गडचांदूर मार्गावरील कापनगाव जवळ राजुरा येथून पाचगाव कडे जाणाऱ्या एका ॲटोला विरूध्द दिशेने येणाऱ्या हायवा ट्रक ने जबर धडक दिली. या घटनेत ३ प्रवाशी जागीच ठार झाले. एका महिलेचा राजुरा येथील उपजिल्हा रुग्णालयात तर दोन महिलांचा रस्त्यात मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली असून एका गंभीर प्रवाश्याला चंद्रपूर जिल्हा रूग्णालयात रेफर करण्यात आले आहे. तर एकावर राजुरा उपजिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ४ वाजता ही दुर्देवी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत रवींद्र हरी बोबडे, वय ४८, रा. पाचगाव, शंकर कारू पिपरे, वय ५०, रा. कोची, सौ. वर्षा बंडू मांदळे, वय ४१, रा. खामोना, तनु



सुभाष पिंपळकर, वय १८, रा. पाचगाव, ताराबाई नानाजी पापुलवार, वय ६० वर्ष, रा. पाचगाव आणि ऑटो चालक प्रकाश मेश्राम, वय ५० वर्ष, रा. पाचगाव या सहा प्रवाशांचा मृत्यू झाला. याव्यतिरिक्त चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात निर्मला रावजी झाडे, वय ५० वर्षे, पाचगाव यांना चंद्रपूर जिल्हा रूग्णालयात रेफर करण्यात आले असून भोजराज महादेव कोडापे, वय ४० वर्षे, भुरकुंडा यांचे वर राजुरा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

राजुरा पोलिसांनी याची दखल घेऊन तातडीने घटनास्थळी पोहोचून सर्व जखमींना रुग्णालयात दाखल केले आणि ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ट्रकचालक अद्याप फरार आहे. पोलिसांनी ट्रक ताब्यात घेतला आहे रुग्णालयात आमदार देवराव भोंगळे यांनी भेट दिली असून ठाणेदार सुमित परतेकी, सहायक पोलिस निरीक्षक हेमंत पवार व सहकारी पुढील तपास करीत आहेत. राजुरा येथुन पाचगाव कडे ॲटो चालक व सात प्रवाशी ॲटो ने जात होते. राजुरा शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर महामार्गाचे काम सुरू आहे. आज एकाएकी येथे काम करण्यासाठी रस्ता वाहतुकीत बदल करण्यात आला. मात्र याविषयी कसलेही फलक लावले नव्हते. यामुळे ॲटो चालक संभ्रमात पडला आणि हायवे वर ॲटो घेतल्यानंतर हायवा ट्रक ने ॲटोला भीषण धडक दिली. ही टक्कर एवढी भीषण होती की, संपूर्ण ॲटोचा चुराडा झाला. यावेळी तिन प्रवाशी जागीच ठार झाले. तर एक राजुरात व तिन जखमींना चंद्रपूर जिल्हा रूग्णालयात रेफर केल्यानंतर रस्त्यात दोघांचा मृत्यू झाला. रुग्णालयात लोकांनी खूप गर्दी केली. ग्रील या हायवेच काम करणाऱ्या कंपनीवर व अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात यावे असा आग्रह उपस्थितांनी धरला. जनतेचा आक्रोश पाहून दंगा नियंत्रण पथकही बोलवण्यात आले. एकाच वेळी ६ जण दगावल्याने जनतेत आक्रोश दिसत असून तणावपूर्ण शांतता राजुरात दिसत आहे.

## उल्हासनगरात खुनाचा प्रयत्न करणारे तिघे आरोपी जेरबंद; हिललाईन पोलिसांची मोठी कामगिरी

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.२९, उल्हासनगर :** उल्हासनगरातील हिललाईन पोलीस स्टेशन हद्दीत झालेल्या खुनाच्या प्रयत्न प्रकरणातील तिघा सराईत आरोपींना पोलिसांनी जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. जुन्या वादातून २७ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजता साईनाथ कॉलनी येथील सार्वजनिक शौचालयाजवळ योगेश उर्फ बबडया सदानंद मिश्रा आणि त्याचा मित्र धिरज रविंद्र विठ्ठले यांच्यावर चॉपर, कोयता आणि अग्निशस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या घटनेनंतर हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या हल्ल्यात आरोपी नामे –
१) इकबालअहमद वकिल अहमद शेख,
२) मोनु अलीहसन शेख,
३) जुनेद अशिक अली शेख,
४) अभिमन्यु ओमप्रकाश पटेल,
तसेच त्यांचे काही साथीदार सहभागी होते.

गुन्हा करून आरोपी पसार झाले होते. मात्र ठाणे शहराचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) संजय जाधव, परिमंडळ ४ चे पोलीस उप आयुक्त सचिन गोरे आणि अंबरनाथ विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके तयार करून शोधमोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत गुन्हे शाखा घटक-४, उल्हासनगरच्या पथकाने आरोपी जुनेद अशिक अली शेख (वय १९, रा. वीर तानाजी नगर, उल्हासनगर-५) याला अटक केली. न्यायालयाने त्याला ३० ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यानंतर पुढील तपासादरम्यान आरोपी अभिमन्यु ओमप्रकाश पटेल (वय २०, रा. नेहरू नगर, उल्हासनगर-५) आणि मोनु अलीहसन शेख (वय २१, रा. साईनाथ कॉलनी, उल्हासनगर-५) यांनाही पोलिसांनी जेरबंद केले असून न्यायालयाने त्यांना २ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

## गणेशोत्सवातील मोदक गोड; पण नारळाची किंमत कडू



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** गणेशोत्सव म्हणजे आनंद, भक्ती आणि प्रसादातील गोड मोदक; पण या मोदकाचा अविभाज्य घटक असलेला नारळ यंदा दिव्यात चांगलाच महागला आहे. यावेळी नारळाच्या भावांनीसुद्धा सामान्य भाविकांची चांगलीच पंचाईत केली आहे.

गेल्या आठ महिन्यांपासून नारळाच्या किमती सातत्याने वाढत आहेत. बाजारात नारळाची आवक कमी असून, दिव्यात येणारा बहुतेक माल कर्नाटक आणि तामिळनाडू येथून येतो. मात्र, तिथूनही पुरेशा प्रमाणात नारळ न आल्याने भाव वाढले आहेत. याआधी फक्त १० रुपयांत मिळणारा नारळ आता २५ रुपयांपासून ६० रुपयांपर्यंत विकला जात आहे. पूर्वीचा ६० रुपयांचा दर्जेदार नारळ ४० रुपयांना मिळायचा; पण आज तोच पुन्हा ६० रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

**नारळाची आवकच कमी...**

गणपतीमध्ये मोदकासाठी नारळाला प्रचंड मागणी असते; पण यंदा आवकच कमी आहे. माल कमी आल्याने दर वाढले आहेत. आम्हालाही ग्राहकांना समजावून सांगावे लागत आहे, असे दिव्यातील नारळ विक्रेते गोपीनाथ म्हात्रे यांनी सांगितले.

**गणेशभक्तांची कसरत...**

प्रत्येक घरात गणपती बसतो आणि मोदकांच्या नैवेद्याला नारळ गरजेचा असतो. त्यामुळे कितीही महाग झाले तरी भक्त नारळ घेत आहेत; मात्र भाविकांमध्ये नारळाच्या महागाईबाबत नाराजीचे सूर ऐकू येत आहेत.

## मुसळधार पावसाचा बारडकरांना फटका...
## तहसीलदारांनी केली नुकसानीची पाहणी...




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील बारड सांडपाणी निचऱ्याच्या व्यवस्थापनचा अभाव असल्याने तसेच वस्तीतील नाल्या तुंबल्यामुळे पावसाचे पाणी घराघरात शिरल्याने बारडकरांना त्याचा मोठा फटका बसला आहे. तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी नुकसानीची पाहणी करून स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांस अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायतीने मान्सून पूर्व सांडपाणी व्यवस्थापनाचे तसेच नालेसफाईच्या ढिसाळ नियोजनामुळे दि. २९ शुक्रवारी सकाळच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे पांदनवस्ती, इंदिरानगर, विठ्ठल-रुक्मिणी नगर, भीम नगर वस्तीत घराघरात पाणी शिरले आहे यामुळे एकच तारांबळ उडाली होती. काही वस्तीत नाल्या नसल्यामुळे तर काही ठिकाणी नाल्या तुंबल्यामूळे पावसाच्या पाण्याचा निचरा झाला नाही यामुळे घरातील संसार उपयोगी वस्तूंचे मोठे नुकसान झाले यासोबतच घरातील धान्याचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. घरात गुडघ्यापर्यंत पाणी असल्यामुळे चुलही पेटल्या नसून संसार उघड्यावर आला आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांनी वरील वस्तींमध्ये भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून नुकसानीची माहिती दिली.

विठ्ठल रुक्मिणी नगर मधील गोविंदराव देशमुख, गुलाबराव देशमुख, साईनाथ आगलावे यांच्या घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. या वस्तीत तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी वापरण्यात आलेल्या नियोजन शून्य विकास कामामुळे पावसाचे पाणी तुंबले आहे. नव्याने बांधण्यात आलेल्या जुन्या गावातील नाल्या उंचवट्यावर बांधल्यामुळे मुख्य बाजारपेठेत पाण्याचा प्रवाह रोखला जाऊन रस्त्याचे रूपांतर नदीत झाल्याचे चित्र आहे. तहसीलदार आनंद देऊळगावकर, ग्रामविकास अधिकारी सतिश लाठकर, सरपंच मंगला बुरडे, उपसरपंच प्रदीप देशमुख, युवा कार्यकर्ते महेश देशमुख यांनी घरात घुसलेल्या पावसाच्या पाण्याची पाहणी केली यानंतर नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाचे आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे.

## पालम नगरपंचायतच्या अध्यक्षपदी
## अनवरी बेगम हिदायततुल्ला खान पठाण यांची बिनविरोध निवड



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२९, पालम (परभणी) :** आज दिनांक २९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता पालम नगरपंचायत च्या अध्यक्ष पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. अध्यक्ष पदासाठी अनवरी बेगम हिदायदतूला खान पठाण यांचा एकमेव अर्ज आला होता त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. यावेळी नगरपंचायत चे मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे व नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी वसंतराव सिरस्कर, उपनगराध्यक्ष भास्करराव सिरस्कर, गट नेते उबेदुल्लाखां पठाण व सर्व नगरसेवक, नगरपंचायत अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या वतीने नवनीर्वाचित नगराध्यक्ष अनवरी बेगम हिदायततुल्ला खान पठाण व प्रतिनिधी इमदाद खान, झियाउल्लाखां यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.




## आफ्रिकान्स

क्षिण आफ्रिकेतील आफ्रिकान्स भाषेला वर्णद्वेषाच्या इतिहासाचे ओझे आजही वाहावे लागत आहे.

संवादाचं माध्यम असलेली भाषा ही अत्याचार, दडपशाही, पिळवणूक यांचं प्रतीक बनू शकते? दक्षिण आफ्रिकेतील आफ्रिकान्स भाषेच्या बाबतीत या प्रश्नाचं उत्तरं होकारात्मक येतं. दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना हीन वागणूक देणारं आणि त्यांचा अनन्वित छळ करणारं वर्णभेदाचं (अपार्थिड) धोरण संपुष्टात येऊन तीन दशकं लोटली असली आणि तिथं कृष्णवर्णीय सत्तेत आले असले, तरी आफ्रिकान्स भाषेची प्रतिमा फारशी बदलली नाही. तेथील बहुतेक कृष्णवर्णीय आफ्रिकान्सकडं अत्याचाराची, दडपशाहीची भाषा म्हणूनच पाहतात. दक्षिण आफ्रिकेतील झुलू आणि झोसा या भाषांनंतर सर्वाधिक संख्येनं बोलल्या जाणाऱ्या आणि सत्तर लाखांहून अधिकांची भाषा असलेली आफ्रिकान्स वर्णद्वेषाच्या इतिहासाचं ओझं आजही वाहाते आहे.

आफ्रिकान्स भाषा १६१६ ते १६५२ या काळात विकसित होत गेली. डच, पोर्तुगीज वसाहतकार दक्षिण आफ्रिकेच्या किनारपट्टीवर येऊ लागल्यानंतर स्थानिक भाषकांशी त्यांचा संपर्क होऊन एक नवी भाषा तयार होऊ लागली. ही भाषा म्हणजे आफ्रिकान्स. या भाषेत विविध युरोपीय भाषांतील शब्द असले, तरी ती प्रामुख्यानं डच आणि झुलू यांच्या प्रभावातून विकसित झाली. त्या काळात दक्षिण आफ्रिका ही डचांची वसाहतही होती. पुढे डच आणि ब्रिटिश यांच्यात संघर्ष झाला आणि नंतर ब्रिटिशांनी वर्चस्व मिळविलं. मात्र, तोपर्यंत आफ्रिकान्स भाषा व्यवहारात रुळली होती. ती शाळांमधून शिकविण्यासही सुरुवात झाली होती. प्रारंभी ती अरबी लिपीतून लिहिली जात असे. नंतर ती लॅटिन (रोमन) लिपीतून लिहिली जाऊ लागली. ब्रिटिश आल्यावर इंग्लिशचा वापरही सुरू झाला; परंतु आफ्रिकान्सचा वापर कमी झाला नाही. १९२५मध्ये तिला दक्षिण आफ्रिकेच्या अधिकृत भाषेचा दर्जा मिळाला. यानंतरच आफ्रिकान्स ही 'अत्याचारा'ची भाषा बनली.

दक्षिण आफ्रिकेतील 'नॅशनल पार्टी'नं १९४८मध्ये वर्णद्वेषाधारित धोरण आणलं. वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंकारातून साकारलेलं धोरण कृष्णवर्णीयांना दुय्यम नागरिकत्व देणारं आणि त्यांची पिळवणूक करणारं होतं. श्वेत आणि कृष्णवर्णीय एकमेकांत मिसळणार नाहीत, त्यांच्यात मैत्री होणार नाही, परस्परांत विवाह होणार नाहीत, याची 'दक्षता' या धोरणातून घेतली गेली. त्यासाठीच्या सूचना आफ्रिकान्स भाषेतून दिल्या जात. शिवाय शाळांत याच भाषेच्या माध्यमातून शिक्षण दिलं जाई. त्यातून गोऱ्यांचं वर्णश्रेष्ठत्व बिंबवलं जायचं. आफ्रिकान्स ही अशा प्रकारे श्वेतवर्णीय सत्ताधाऱ्यांची (आफ्रिकनारांची) भाषा बनली आणि कृष्णवर्णीय त्याकडे आपल्याला हीनत्व देणारी भाषा म्हणून पाहू लागले. या धोरणाच्या विरोधात कृष्णवर्णीयांनी मोठा लढा दिला. त्यातील एक लढा होता १९७६चा. हा लढा प्रामुख्यानं आफ्रिकान्स भाषेच्या विरोधात होता. पुढे नेल्सन मंडेला यांच्या नेतृत्वाखाली कृष्णवर्णीयांचा लढा यशस्वी झाला आणि १९९४मध्ये त्यांना खऱ्या अर्थानं स्वातंत्र्य मिळालं. तिथली वर्ण आणि वंश यांच्यावर आधारलेली पद्धत गेली आणि लोकशाही व्यवस्था सुरू झाली. त्यानंतर स्वाभाविकच धोरणंही बदलली. मात्र, आफ्रिकान्सची प्रतिमा बदलली नाही.

दक्षिण आफ्रिका हा बहुभाषक आणि बहुसांस्कृतिक देश असून, सध्या तिथं इंग्लिश, आफ्रिकान्स यांसह एकूण ११ भाषांना अधिकृत भाषांचा दर्जा आहे. (त्यात अलीकडंच चिन्ह भाषेची भर पडली आहे.) अलीकडच्या काळात तिथं मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर असला, तरी त्यामधील गुंतागुंत काही कमी नाही. स्थानिक भाषा विशिष्ट समूहांपुरती असल्यानं इंग्लिश आणि आफ्रिकान्स यांना असलेली व्यापकता त्यांना नाही. त्यामुळे तिथं २०१५मध्ये आफ्रिकान्स माध्यमातील शिक्षणाचं धोरण राबविण्यात आलं. मात्र, त्याच्या विरोधात जोरदार आंदोलन झालं. विद्यार्थी रस्त्यावर उतरले. 'आफ्रिकान्समस्टफॉल' ही चळवळ सुरू झाली. आफ्रिकान्सच्या विरोधातील राग शमला नसल्याचं यातून स्पष्ट झालं. आफ्रिकान्सला अधिकृत दर्जा मिळाल्याची शताब्दी यंदा साजरी होत असताना, त्याचा गुंतागुंतीचा इतिहास समजून घेण्याचं आवाहन तेथील अभ्यासक करीत आहेत.

# मातीच्या मूर्तीतील आपला देव



- विनोद जाधव
मासरूळ जि.बुलडाणा
मो.९७६३२८२०७७



आपल्या आराध्य दैवतेची मूर्ती आपल्या अंतर्मनात घर करून बसते. सर्व धर्मामध्ये परमेश्वराला मानण्याचं एक प्रतीक असतं. काहींना मूर्ती पूजा मान्य नाही नसली तरी वेगवेगळ्या माध्यमातून परमेश्वराच्या अस्तित्वासमोर नत होऊन आपल्या अंतर्मनातील इच्छा,आकांक्षा त्याच्यासमोर व्यक्त करतात.सुख समाधानासाठी प्रार्थना करतात मग तो कुठल्याही रूपात असो. प्रार्थना स्थळावर आपले मन हलके करतात. जणूकाही तो आपलं सारं काही ऐकतोय अशी मनातून आपली त्याच्याप्रति श्रद्धा असते आणि हो हे तेवढंच खर आहे...! आपल्या प्रिय श्रद्धास्थानासमोर अंतर्मनापासून केलेली प्रार्थना तो नक्की ऐकतो.हिंदू संस्कृतीमध्ये मूर्ती पूजेला मान्यता आहे.वेगवेगळ्या प्रकारचे आराध्य दैवत आपण पूजतो.विशेषतः भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला समस्त देशासह विदेशातही घरा- घरात गणपतीबाप्पा विराजमान होतो. त्याची सर्व मनोभावे पूजा अर्चना करतात.

आपल्या कुठलेही आराध्य दैवताची प्राणप्रतिष्ठा होण्या अगोदर किंवा विराजमान होण्याअगोदरची पार्श्वभूमी मात्र वेगळी असते. आपण उदाहरणादाखल संकटमोचन गणपती बाप्पा बद्दल थोडंसं बघूया.श्रावणातील भगवान शिवजींची पूजापाठ,व्रत वैकल्य संपले की,आपणास भाद्रपदातील चतुर्थीची ओढ लागते.दिनदर्शिकात बघून आपण गणपतीबाप्पा येण्याची आतुरतेने वाट पाहतो.सार्वजनिक गणेश मंडळे तर,एक ते दोन महिन्याअगोदर बाप्पाच्या आगमनाची तयारी करतात.पुणे,मुंबई सारख्या महानगराप्रमाणे इतर जिल्ह्यातील व तालुक्यातील लोकप्रिय गणेश मंडळ सुद्धा बाप्पाच्या जय्यत तयारीला लागतात.मंडळातील सदस्य ज्याच्या त्याच्या सवडीप्रमाणे वेळ काढून आपला उद्योग,व्यवसाय सांभाळून तयारी करण्यासाठी मदत करतात.त्यासाठी आवश्यक वर्गणी जमा करतात.त्याचप्रमाणे घरगुती गणपतीसाठी सुद्धा लहान मुले,चिमुकले आपल्या आई- बाबांसमोर गणपतीचा मखर, डेकोरेशन, यासाठी हट्ट धरतात.बाजारामध्ये स्वतः आई-बाबांसोबत जातात.आई बाबा सुद्धा मुलांच्या हट्टा साठी मुलांच्या आवडीच्या वस्तू खरेदी करतात. छान-छान डेकोरेशनसाठी शोभेच्या वस्तू घेतात.कारण बाप्पा सर्वांचा लाडका आहे. अबालवृद्धांचा बाप्पा हे प्रिय दैवत आहे. सर्वांच्या अंतर्मनात बाप्पाच्या आगमनाची एक वेगळी ओढ दिसून येते.

गणपती बाप्पाच्या आगमनासाठी कितीतरी महिन्यापासून पूर्वतयारी करतात. व्यावसायिक मूर्तिकार तर वर्ष-वर्षअगोदर पासून सुंदर मूर्ती बनवण्यास गुंतले असतात. कलाकार वेगवेगळ्या आकारामध्ये मुर्त्या बनवतात.अगदी लहानात लहान ते सार्वजनिक मंडळातील भव्य अश्या शाडू मातीच्या मूर्ती बरोबर पीओपीच्या मूर्ती बनवून कलाकारवर्ग रंग कामासाठी कित्येक दिवसापासून गणपती बाप्पांची मूर्ती आकर्षक कशी दिसेल यासाठी आपले कला-कौशल्य पणाला लावतात.बाप्पाच्या सुंदर-सुंदर मुर्त्या जेव्हा मूर्तिकार मूर्ती बाजारात विकण्यासाठी आणतो. आपण ठेवलेल्या आकर्षक मुर्त्या बघतो सर्व मुर्त्यापैकी आपल्या अंतर्मनाला आवडेल ती निवडतो.खरंच त्यांची रचना किती न समजणारी व आपल्या न उलगडण्या पलीकडची सते ना खरचं...!तो स्वतःला बाजारात विकण्यासाठी उभा ठाकतो, ते केवळ कुणाचं तरी पोट भरावं म्हणून,कुणाचातरी उदरनिर्वाह चालावा म्हणून एका मूर्तीच्या रूपात.याच जगाचं दुःख निवारण करणाऱ्याची आपण किंमत ठरवतो.अहो! एवढेच काय,हाताच्या बोटाने इशारा करून ती मूर्ती कितीला आहे?अंतर्मनात बसलेला बाप्पा,सर्व जगाचे दुःख निवारण करणारा बाप्पा,सर्वांच्या आयुष्यात सुख घेऊन येणारा बाप्पा,जेव्हा मूर्ती म्हणून खरेदी केल्यानंतर आपल्या हातात घेतो.त्याला मस्तकावर घेऊन मिरवतो.ढोल ताशांच्या गजरात त्याला आपण घरासमोर आणतो.आपली आई, बहीण,पत्नी त्याचे अष्टगंध,हळदी-कुंकवाने पूजन करून घरात घेतो. योग्य मुहूर्तावर त्याची विधिवत पूजा करून विराजमान करतो. त्याच्यासाठी छान-छान मोदक,दुर्वा, सुगंधी फुलाचे हार आपण अर्पण करतो. त्याच्यासाठी छान आसन मांडतो. सर्वजण आनंदात आरती म्हणतो.तो आपल्याला त्याच्या भक्तीचा लळा लावतो.बुद्धीचे देवता, संकट निवारक म्हणून आपले संकट निवारण करतो व तेवढ्याच अभिमानाने आपण सर्व लहान-थोर आपल्या घरात विराजमान झालेल्या बाप्पाला म्हणतो आमचा बाप्पा...!

बघितलं ना! मूर्तिकाराकडे हाच बाप्पा आपण निवडे पर्यंत, आपल्या अंतर्मनात ठसून बसेपर्यंत एक मातीची मूर्ती असतो, मात्र त्याच्या अपार प्रेमाने,मायेने अन आशीर्वादाने तीच मूर्ती आपल्या अपार श्रद्धेतून,भावातून आपल्यासाठी देव बनून जातो...!

**गणपती बाप्पा मोरया...!**

# साथीचे आजार टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी गरजेची

राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते १४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात एन्फ्लुएंजा आजाराचे ( फ्लू ) ६६३ रुग्ण आढळले आहेत यापैकी १४ रुग्ण मागील दीड महिन्यात आढळले असून तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अर्थात ही सरकारी आकडेवारी आहे. रुग्णांची संख्या यापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे केवळ फ्लूू आजारानेच नव्हे तर डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहेत. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण आढळत आहे नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. पाच वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की म हानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५


# गणेशउत्सव काळात मुंबईला गालबोट नको...!!

मराठा आरक्षणाचा मुद्दा घेऊन मनोज जरांगे दोन वर्षांपासून लढत आहेत. आता त्यांनी पुन्हा एकदा मुंबईत आंदोलनाचा घाट घातला आहे, त्यासाठीची त्यांनी निवडलेली वेळ मात्र सर्वांनाच खटकत आहे. मनोज जरांगे हे जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून २७ऑगस्टला निघणार आणि शिवनेरीमार्गे २९ ऑगस्टला मुंबईतील आझाद मैदानात पाऊल ठेवणार, असे त्यांचे नियोजन आहे. २७ तारखेला श्रीगणेशाचे आगमन होत आहे. दहा दिवसांचा हा उत्सवाचा, उत्साहाचा काळ आहे. मुंबईतील जनजीवन विस्कळीत होऊ नये म्हणून आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी देता येणार नसल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. ते अगदी खरे आहे. मुंबईतील गणपती उत्सवाबद्दल वेगळं सांगण्याची गरज नाही. राज्यभरातून, देश-विदेशातून येथील गणपती उत्सव पाहण्यासाठी लोक येत असतात. लालबागचा राजाचे केवळ मुखदर्शन व्हावे यासाठी लाखोंची रांग लागते. देशाचे गृहमंत्री अमित शहा उत्सव काळात सुरुवातीचे दोन दिवस मुंबईत मुक्कामाला आहेत. अनेक केंद्रीय मंत्री, उद्योगपती, सेलिब्रिटी गणरायाच्या दर्शनासाठी येत असतात. यामुळे पोलीस यंत्रणेवर प्रचंड ताण असणार आहे.

मुंबई आणि राज्यातीलच एकूण सुरक्षा व्यवस्थेचा आढावा मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांनी घेतला. एकट्या मुंबईत १७ हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा गणपती उत्सवकाळात तैनात असणार आहे. फक्त पोलीसच नाही तर एसआरपीएफ, क्यूआरटी टीम, दंगल नियंत्रण पथक, वाहतूक पोलीस, आरपीएफ प्लाटून, एसआरपीएफ प्लाटून, होमगार्ड अशी विविध पथके या काळात सुरक्षेसाठी तैनात असणार आहेत. एवढी सगळी सुरक्षा यंत्रणा असूनही छोट्या-मोठ्या घटना या होतच असतात. मुंबई हे हायपर सेन्सेटीव्ह शहर आहे. गणरायाच्या उत्सवात अख्खी मुंबई भक्तीरसात दंग झालेली असते. या उत्सवाला गालबोट लागू नये म्हणून हा सगळा बंदोबस्त असतो. यामध्ये मराठा आंदोलकांचा मोर्चा मुंबईत दाखल झाला तर सुरक्षा यंत्रणेवर प्रचंड ताण येण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा अतिसंवेदनशील आहे. याआधीची मनोज जरांगे यांची आंदोलने पाहिली, त्यासाठी जमलेला जनसमुदाय पाहिला तर मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून जर मराठा आरक्षण आंदोलक मुंबई शहरात आझाद मैदानात दाखल झाले तर त्यांच्या सुरक्षेचा, राहण्याचा आणि इतरही अनेक बाबींचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये २०१८ मध्ये आंदोलनावेळी काकासाहेब शिंद या तरुणाने आंदोलन तीव्र झाल्यानंतर गोदावरी नदीत उडी घेतली होती. यामुळे मुंबईतील आंदोलनावेळी सुरक्षा यंत्रणेला डोळ्यात तेल घालून काम करावे लागेल. ऐन गणपती उत्सवकाळात हे आंदोलन करणार असल्याचे जाहीर केल्यामुळे सुरक्षेसह अनेक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीसह कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी उच्च न्यायालयाने जरांगे पाटलांना मुंबईऐवजी खारघर येथील जागेचा पर्याय दिला आहे. उच्च न्यायालयाने आंदोलनाच्या अधिकारावर गदा आणलेली नाही. मनोज जरांगे यांनी आंदोलनासाठी परवानगीच घेतलेली नाही, असे कळल्यानंतर न्यायालयाने जरांगे यांनी आंदोलनासाठी यंत्रणेकडे परवानगी मागावी, ती दिली तर शांततेत मुंबईऐवजी नवी मुंबई, खारघरमध्ये आंदोलन करावे हेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे न्यायालयाने जरांगेची बाजू मांडण्यासाठी त्यांच्या वतीने न्यायालयात कोणी नसतानाही त्यांच्या आंदोलनाच्या स्वातंत्र्याचे हनन होऊ दिलेले नाही.

सरकारी पातळीवरुन जरांगेंना आंदोलन पुढे ढकलण्यासाठी अनेक अर्जवे करण्यात आली. गणपती उत्सव होऊ द्या, त्यानंतर आंदोलन करा, असा मुख्यमंत्र्यांचा निरोप घेऊन गेलेल्या ओएसडींना रिकाम्या हाताने परतावे लागले. गेल्या दोन वर्षांमध्ये अनेकदा उपोषणे झाली. मराठवाड्यातील मराठा समाजाकडे कुणबी दाखले असतील तर त्यांना कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती काम करत आहे. या समितीला सहा महिने मुदतवाढ देण्यात आली, या मुदतवाढीला मराठा आंदोलकांनीही मान्यता दिलेली आहे. याशिवाय मराठा आरक्षणासाठी मंत्रिमंडळ उपसमिती काम करत आहे. राधाकृष्ण विखे-पाटील समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीने हैदराबाद गॅझेट आणि इतरही गॅझेटचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. कायद्याच्या प्रक्रियेत काही बाबी अडकल्या आहेत. त्यावर चर्चेने तोडगा निघू शकतो मात्र, चर्चेचा आता कंटाळा आला असे म्हणणे लोकशाहीत योग्य होणार नाही. आंदोलनाने शक्तिप्रदर्शन होईल. महामुंबईत महाजनसमुदायावर नियंत्रण ठेवणे एका व्यक्तीला शक्य होईल का, याचाही विचार होण्याची गरज आहे. भलेही जरांगे यांनी चार महिन्यांपूर्वी २९ ऑगस्टपासून मुंबईत आंदोलनाचा इशारा दिला होता, गेल्या चार महिन्यात सरकारने त्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. मात्र श्रीगणेशाच्या उत्सवकाळात मुंबईला, मुंबईकरांना आणि सुरक्षा यंत्रणेला वेठीस धरुन मुंबईकरांना अधिक संकटात टाकण्याचे काम होऊ नये, ही अपेक्षा ठेवणे गैर नाही. आंदोलनाचा श्रीगणेशा उत्सवानंतर अधिक जोमानेही होऊ शकतो, त्यासाठी गणरायाचा आशीर्वाद पाठीशी आहेच, याचे भान आणि संयम आंदोलकांनी ठेवला तर उत्सवात मंगलमय वातावरण राहील. गणेशोत्सवकाळात मुंबईला मराठा आंदोलकांच्या अट्टाहासाचे गालबोट लागू नये हीच अपेक्षा.

- श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.
मु.पो. बेलेवाडी (मासा), कोल्हापूर.



## दर्शना निमीत्त..

भेटी गाठी नेत्यांच्या
बाप्पादर्शना निमीत्त
जन सामान्य जाणते
अन्यत्र लागले चित्त

असे कसे भेटी आले
खवळती आम्लपित्त
खिळूनराहणार लक्ष
करी किती अवचित्त

कॅमेरे सुसज्ज सदैव
टिपावेचित्र सावचित्त
महत्वभेटीगाठीसाठी
प्रसिध्द करा इतिवृत्त

कधीकाळी भांडलोत
आता घेतो प्रायश्चित्त
अरे आधी गणेशापुढे
व्हावेअंमळ एकचित्त

पडू द्या बाहेर मनेच्छा
इथे गप्पा कराव्यामुक्त
गुपिते किती दडवणार
आपसूक सर्वअनावृत्त

निदान मिडीया समोर
भासावे गजानन भक्त
दिसो फोटोत गणराज
सर्वत्र नकोतुम्ही फक्त

हेमंत मुसरीफ, पुणे
मो.९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# आम्ही दिलेले शब्द पुर्णच करतो : सुजय विखे पाटील

**रुपेश ढवण यांचे ९व्या दिवशी आमरण उपोषण मागे...**



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** आम्ही दिलेले शब्द पूर्णच करतो, लवकरच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मी व आ. काशिनाथ दाते सर आणि रूपेश ढवण यांच्या सोबत च्या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाची राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सोबत मंत्रालयात बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत तोडगा काढू, असा शब्द माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी निघोज येथे बोलताना दिला.

आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांचे ९ व्या दिवशी आमरण उपोषण माजी खा. डॉ.सुजय विखे पाटील व आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते, मान्यवर, शेतकरी, वारकरी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत सोडण्यात आले.

शेतकरी नेते रुपेश ढवण यांनी शेतकरी कर्जमाफी, कांदा भाववाढ, कांदा निर्यात शेतकर्यांच्या या व इतर प्रश्नांसाठी बुधवार दि. २० ते काल गुरुवार दि.२८ या गेल्या ९ दिवसांपासून आमरण उपोषण केले. शासकीय पातळीवर त्यांची कोणीही दखल घेतली नाही.

मात्र शेतकरी, वारकरी व ग्रामस्थांच्या आग्रहाखातर भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ, पंचायत समितीचे माजी सदस्य शंकरराव नगरे, सुप्याचे माजी सरपंच दत्ता पवार व इतरांनी मध्यस्थी करीत उपोषणाबाबत रुपेश ढवण यांची भेट घेत त्यांची समजूत काढत थेट माजी खा.डॉ सुजय विखे पाटील व आ. काशिनाथ दाते यांच्या शी बुधवार दि.२७ रोजी चर्चा केली. ही चर्चा यशस्वी झाली व त्याची फलश्रुती काल गुरुवार दि.२८ रोजी माजी खा. डॉ सुजय विखे पाटील व आ. काशिनाथ दाते यांनी उपोषणस्थळी भेट दिली.

माजी खा. डॉ. विखे पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वत : व आ. काशिनाथ दाते यांच्या सोबत राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याशी चर्चा करीत हा शेतकरी हिताचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

आ. काशिनाथ दाते यांनी लवकरच रुपेश ढवण व त्यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे व पणनमंत्री जयकुमार रावळ यांना भेटणार असून राज्य सरकारने या राज्यव्यापी आमरण उपोषणाची दखल घेण्यासाठी योग्य तो पर्याय काढणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी रुपेश ढवण यांनी दिवंगत केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे पाटील, राज्याचे जलसंपदा व पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खा. डॉ सुजय विखे पाटील यांच्या कार्याचे कौतुक करीत हा शेतकऱ्यांचा प्रश्न फक्त सत्ताधारी विखे पाटील परिवारच सोडवू शकतात, अशी खात्री व्यक्त करत, राज्य शासनाच्या माध्यमातून आ. काशिनाथ दाते शेतकर्यां चे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# थोडक्यात

## निवडणुकीआधी पाय पडणारे, आज पाय ओढण्यात दंग - सुजित झावरे

### जनतेच्या हक्कांसाठी मी खंबीरपणे लढत राहणार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** आमच्या झावरे कुटुंबाने नेहमीच जनतेची सेवा केली, पण काही राजकीय पुढारी निवडणुकीनंतर मला टार्गेट करतात. माझ्या मतांचा वापर करून पदे मिळवायची आणि माझ्याबद्दल तिरस्कार ठेवायचा, हा दुटप्पीपणा आहे. निवडणुकीआधी पाय पडणारे आज पाय ओढण्यात दंग आहेत. यापेक्षा कलियुगाचा दुसरा अर्थ काय? सर्व पुढारी एका बाजूला आणि मी एका बाजूला असे चित्र आहे. तरीही जनतेच्या हक्कांसाठी मी खंबीरपणे लढत राहीन. मनाला वेदना होत असल्या तरी चेहऱ्यावर हसू ठेवून कुटुंबाचा राजकीय वारसा पुढे नेईन असे स्पष्ट मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.

श्री गणेश चतुर्थीच्या निमित्ताने पारनेर तालुक्यातील यादववाडी येथील श्री गणेश मंदिर सभामंडप बांधकामाचे भूमिपूजन सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते व माजी सभापती गणेश शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सोहळ्यास सरपंच, उपसरपंच, चेअरमन, मीनाताई यादव, तुकाई देवस्थान अध्यक्ष राजेंद्र शेळके, शहांजापूरचे सरपंच अण्णा मोटे, रविंद्र पाडळकर, संतोष यादव, सुभाष यादव, रमेश औटी, संतोष शेळके, जालिंदर तानवडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात उपस्थितांनी सुजित झावरे पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. यादव वाडीतील हे विकासकाम स्थानिकांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. सुजित झावरे पाटील यांनी जनतेच्या मूलभूत गरजांसाठी कायम कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पवार विरुद्ध विखे परिवार संघर्षात पाण्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर !

## पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांमुळे पारनेरचा पठार भाग पाण्यापासून वंचित - डॉ. सुजय विखे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या पठार भागात दीर्घकाळापासून पाण्याचा प्रश्न डोकेदुखी ठरत आहे. शेतकरी आणि सामान्य जनतेच्या मूलभूत गरजांसाठी पाणी मिळवून देण्यासाठी स्थानिक नेत्यांची झगड झडत असताना या प्रश्नावरून आता पुन्हा एकदा राजकारण तापले आहे.

कान्हुर पठार भागाला पाणी न मिळाल्याचे कारण पश्चिम भागातील नेतृत्व असल्याची वास्तवता आहे. मी कोणावरही टीका करत नाही, परंतु पाण्याचा हा संघर्ष शरद पवार विरुद्ध कै. बाळासाहेब विखे पाटील यात पुणे विरूद्ध नगर असाच राहिलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातल्या नेत्यांनी कुकडी कालव्याचे पाणी नगरला येवून दिले नाही. पारनेर सुजलाम सुफलाम होऊ नये,ही संकल्पना पुणे जिल्ह्यातील लोकांची होती. म्हणून नगर पाण्यापासून वंचित राहावे लागले. याच पार्श्वभूमीवर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी पठार भागाला पाणी देण्याचा निर्धार व्यक्त करत, शरदचंद्र पवार गटाचे खासदार निलेश लंके यांच्यावर नाव न घेता परखड टिकास्त्र सोडले.

ते म्हणाले ज्यांना तुम्ही डोक्यावर घेतलं, त्यांचा आवाज निघतच नाही. त्यांचा खर्चपाणी पुण्यातून चालतोय. ते तुम्हाला काय पाणी देणार? ज्यांचं अस्तित्व पुणे जिल्ह्यामुळे आहे, ते तुमच्या मुलांना भविष्य काय देणार? हा विचार वेळेत करा. कान्हूर पठार येथे गुरुवारी दि.२८ ऑगस्ट रोजी उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचा शुभारंभ तसेच वडगाव दर्या पर्यटन स्थळ विकास कामांचे लोकार्पण डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते झाले. वडगाव दर्या निसर्ग पर्यटन केंद्रासाठी तब्बल ९ कोटींचा निधी मिळाला असून, त्यातील जवळपास दोन कोटींच्या कामांचे उद्घाटन या कार्यक्रमात करण्यात आले. याशिवाय मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २. अंतर्गत किन्ही येथे सौर प्रकल्पाचे भूमि पूजनही झाले. विखे पाटील म्हणाले ज्यांना निवडून दिलं, त्यांचा पाणी प्रश्नावर कधी अभ्यास होता का? फक्त राजकारणात हुशारी दाखवून लोकांचा विश्वास जिंकता येत नाही. मी डॉक्टर झालो, त्यासाठी बारा वर्षं शिकावं लागलं, पण इथे काही जण एका महिन्यात डिग्री घेऊन तयार होतात. लोकसभेच्या पराभवानंतर मी स्वतःला विचारलं – उगाच डिगऱ्या घेतल्या, पण लोकांना पाणी मिळालं का? सिस्पेसारख्या घोटाळ्यावरही त्यांनी थेट सवाल केला. पारनेर तालुक्याच्या जनतेचे पैसे सिस्पेमध्ये गेले. याचं उत्तर कोण देणार? असा थेट प्रश्न त्यांनी खासदार लंके यांना जाहीर सभेतून विचारला.

**पुणे विरूद्ध अहिल्यानगर संघर्ष...**

विखे पाटील यांनी ऐतिहासिक संदर्भ देत म्हटलं पाण्याचा प्रत्येक नारळ पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांनी फोडला. त्यामुळे पठार भाग पाण्यापासून वंचित राहिला. कुकडी कालव्याची खरी कहाणी हीच आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोणत्याही नेत्याने अहिल्यानगरला पाणी येऊ दिलं नाही. अहिल्यानगर सुजलाम सुफलाम होऊ नये हीच त्यांची संकल्पना होती. हा संघर्ष पुणे विरूद्ध अहिल्यानगर आहे. शरद पवार विरुद्ध स्व. बाळासाहेब विखे पाटील आहे. आणि या संघर्षाला तोंड द्यायची धमक फक्त विखे पाटील परिवारात आहे.

# 'आदि कर्मयोगी अभियान' मध्ये जिल्हा अग्रेसर राहावा - जिल्हाधिकारी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९ चंद्रपूर :** सन २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत, सेवा व लोककेंद्रित विकासाची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यासाठीच प्रतिक्रियाशील सुशासन कार्यक्रमाचा भाग म्हणून केंद्रीय आदिवासी कार्य मंत्रालयाने 'आदि कर्मयोगी अभियान' सुरु केले आहे. या अभियानात चंद्रपूर जिल्हा अग्रेसर राहावा. यासाठी सर्व यंत्रणांनी योग्य समन्वयातून काम करावे, असा निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिला.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर तर्फे नियोजन सभागृह येथे आयोजित तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या कार्यशाळेत ते निर्देश देत होते. जिल्हाधिकारी म्हणाले, 'आदि कर्मयोगी अभियान' हे केंद्र शासनाचे अतिशय महत्वाकांक्षी अभियान आहे. या अंतर्गत मास्टर ट्रेनर तयार करुन तसेच लोकांचा सहभाग घेऊन प्रत्येक आदिवासी गावातील समस्यांची मांडणी असलेले डॉक्युमेंट तयार केले जाईल. जेणेकरुन, 'विकसित भारत – २०४७' च्या व्हीजन डॉक्युमेंटमध्ये त्याचा समावेश करता येईल. त्यासाठी राज्य, जिल्हा. ब्लॉक आणि ग्रामस्तरावर तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या अभियानात पीएम जनमन योजना, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, राष्ट्रीय सिकलसेल उच्चाटन मोहीम आणि एकलव्य निवासी शाळांचा विस्तार आणि शिष्यवृत्ती या व इतर योजनांचे एकत्रीकरण करुन व्हीजन डॉक्युमेंट तयार करावयाचे आहे. मुख्य म्हणजे यात जिल्है परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतींची मुख्य जबाबदारी राहणार आहे.

केंद्र आणि राज्यस्तरावरुन या अभियानाचा नियमित पाठपुरावा सुरु असून, २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत हा आराखडा मंजूर करुन घ्यावयाचा आहे. त्यामुळे यात प्रत्येक यंत्रणेचा सहभाग आवश्यक आहे. त्यासाठी योग्य समन्वय व सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनीसुध्दा मार्गदर्शन केले. कार्यशाळेला सर्व विभागाचे प्रमुख, जिल्हास्तरीय तज्ज्ञ, प्रशिक्षक, गटविकास अधिकारी. नोडल अधिकारी आदी उपस्थित होते.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांनी रस्ते व उड्डाणपुलांच्या कामांसाठी घेतली ना. गडकरी यांची भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा मतदारसंघासह चंद्रपूर जिल्ह्यातील विविध रस्ते व उड्डाणपुलांच्या कामांसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट घेतली. यावेळी सोपविलेल्या निवेदनांवर ना. गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर संबंधित कामांच्या संदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला. ना.गडकरी यांच्या भेटीत चंद्रपूर–मूल राष्ट्रीय महामार्ग सिमेंट काँक्रीट करण्याबाबत तसेच जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गांच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर निवेदन सादर केले. नेहमीप्रमाणेच ना. गडकरी यांनी संवेदनशीलतेने विषय ऐकून घेतला आणि सकारात्मक प्रतिसाद देत पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या ठाम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळेच देशातील रस्ते विकासाचा वेग वाढत असून चंद्रपूर जिल्ह्यालाही या विकासप्रवाहाचा मोठा लाभ मिळेल, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

यामध्ये विशेषतः मुल शहरातील वाहतूक समस्येच्या संदर्भात आ. मुनगंटीवार यांनी निवेदन सोपवले. सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर यांच्याद्वारे मुल बायपास रस्त्याची रचना करण्यात आली आहे. त्यानुसार या मार्गासाठी जमिनीचे अधिग्रहणही पूर्ण झालेले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३० पासून मुल शहरातील रेल्वे क्रॉसिंगमार्गे उमा नदीच्या पुलाजवळून जाणारा हा बायपास रस्ता सुमारे ६.१४ किमी. लांबीचा असेल. या प्रस्तावित बायपास रस्त्यावर एक रेल्वे क्रॉसिंग असल्यामुळे त्यावर रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) चे बांधकाम करणे आवश्यक आहे, असे आ. मुनगंटीवार यांनी ना. गडकरींना सांगितले. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० मुल–चंद्रपूर (महाराष्ट्र) येतो. या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूस चंद्रपूर जिल्ह्यातील जानाला, आगडी, गोंडसावरी, महादवाडी, अजयपूर, चिचपल्ली, वलनी, घंटाचौकी आणि लोहारा ही गावे आहेत. या गावांच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूस जुन्या, अरुंद व तुटलेल्या नाल्यांमुळे पावसाचे व सांडपाण्याचे योग्य प्रकारे निस्सारण होत नाही. त्यादृष्टीने मुल–चंद्रपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूस आरसीसी काँक्रीट नाली (अंदाजे लांबी ८.०० किमी) मंजूर करणे आवश्यक असल्याची बाब आ. मुनगंटीवार यांनी मांडली. यासोबतच



बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील बल्लापूर, मुल, पोंभुर्णा येथील विविध विकासकामांना केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजुरी देण्याची मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली. महाराष्ट्रातील मुल–चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग (एन.एच. ९३०) वरील रेल्वे क्रॉसिंग (गेट क्र. जी.सी.एफ. १२३) येथे दररोजच्या प्रचंड वाहतुकीमुळे दीर्घकाळ वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण होते. यामध्ये केवळ सामान्य नागरिक, शालेय मुले व आपत्कालीन सेवा (ॲम्ब्युलन्स, फायर ब्रिगेड) यांनाच अडथळा निर्माण होत नाही तर आर्थिक व औद्योगिक क्रियांवरही नकारात्मक परिणाम होतो. या समस्येच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी संबंधित ठिकाणी रेल्वे ओव्हर ब्रिज (उड्डाणपूल) बांधणे आवश्यक आहे, ही बाब आ. मुनगंटीवार यांनी निदर्शनास आणून दिली.

# विंचूर लासलगाव येथील ब्राह्मणांनी एकत्र येऊन केले ऋषीपूजन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील श्रीराम मंदिरात ऋषीपंचमी निमित्त श्रावणी प्रयोग, ऋषीपूजन हा उत्सव विंचूर आणि लासलगाव येथील ब्राह्मणांनी एकत्र येऊन यथासांग पार पडला. यज्ञोपवित (जाणवे) धारण करणा–या विप्रांसाठी सांगितलेल्या एका महत्त्वाच्या धार्मिक विधीमध्ये श्रावणी प्रयोगाला विशेष महत्व आहे. याला श्रावणी उपकर्म असेही म्हणतात. हा उत्सव आत्मनिरीक्षण, शुद्धीकरण आणि नवीन सुरुवात करण्याची संधी प्रदान करतो. आत्मशुद्धी, विधी नूतनीकरण आणि वेदारंभ यांचा यात समावेश असतो. या उत्सवात, यज्ञोपवीत बदलले जाते, पंचगव्य स्नान केले जाते, ऋषी–तर्पण आणि सप्त ऋषी पूजन केले जाते. भविष्यात चांगले कर्म करण्याची प्रतिज्ञा घेतली जाते. ब्राह्मण भोजनाचे नियोजन अशोक अग्निहोत्री यांनी केले तर पौरोहित्य दिपकशास्त्री कुलकर्णी यांनी केले. या श्रावणी प्रयोगासाठी विंचूर आणि लासलगाव येथील विप्र बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

# चंद्रपुरात मनपाच्या फिरते विसर्जन कुंड रथाचे उद्घाटन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २९, चंद्रपूर :** माझी वसुंधारै अभियान ६.० अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे शहरात मूर्ती विसर्जनाच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेल्या ३ फिरत्या विसर्जन रथाचे गुरुवार ला मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांचेया हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त संदिप चिद्रवार, मुख्य लेखा परीक्षक मनोज गोस्वामी, सहाय्यक आयुक्त अनिलकुमार घुले, डॉ. नयना उत्तरवार, डॉ. अमोल शेळके, उपअभियंता रवींद्र कळंबे, उपअभियंता प्रगती भुरे, चैतन्य. चोरे, व मनपा अधिकारी– कर्मचारी उपस्थित होते.

उत्सवादरम्यान होणारी गर्दी टाळण्याकरीता महापालिका प्रशासनातर्फे घरगुती गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी झोननिहाय' फिरत्या विसर्जन कुंडाची' व्यवस्था करण्यात आली आहे. या फिरत्या विसर्जन कुंडासाठी झोननिहाय संपर्क क्रमांक महापालिकेद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. मनपातर्फे पुरविण्यात आलेल्या या घरपोच सुविधेमुळे अत्यंत शांतीपूर्ण व भक्तीमय वातावरणात भाविक आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देत आहेत. शहरात दीड दिवसाच्या गणपतीचीही स्थापना करण्यात येत असल्याने स्थापनेच्या दुसऱ्याच दिवशी विसर्जन व्यवस्थेची गरज भासते. दीड दिवसाच्या गणेश मूर्तीचे विसर्जन करण्याच्या दृष्टीने मनपाद्वारे उभारण्यात आलेल्या २५ कृत्रिम तलावात गुरुवार २८ ऑगस्ट दुपारी ३ वाजेपर्यंत ६४९ गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

# मांजरा धरणाचे उघडले ६ दरवाजे ; नदी काठच्या गावांना इशारा



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२९, केज (बीड) :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असणारे बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांतील अनेक गावांची तहान भागवणारे मांजरा धरण गेल्या तीन चार दिवसापासून सतत चालू असणाऱ्या पावसामुळे ओव्हर फ्लो झाल्यामुळे आज देखील दि.२९ शुक्रवार दुपारी ०१.४५ धरणाचे चार दरवाजे (क्र.१,३,४,६) १.०० मीटरने तर दोन दरवाजे(२,५) ०.७५ मीटरने उघडण्यात आले आहेत. यातून १९२१८.५४ क्यूसेक्स (५४४.२८ क्यूमेक्स) इतका विसर्ग नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. धरणात येणाऱ्या पाण्याचे आवक पाहून विसर्ग कमी किंवा जास्त करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. तरी नदीकाठावरील गावातील नागरिकांना सतर्क राहण्याचा सूचना पूर्ण नियंत्रण कक्षाकडून देण्यात आल्या आहेत.